# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र. १७/२०२५ दिनांक ११/०१/२०२५

**पॅनकार्ड अपडेट करण्याचे सांगुन फसवणुक झालेल्या तक्रारदार यांना २,७२,४५५/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. नायर यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन करुन सांगितले की, त्याचे पॅनकार्ड अपडेट नसल्याने यापुढे त्यांना कोणतेही आर्थिक व्यवहार करता येणार नाही. तसेच पॅनकार्ड सुरळित चालु करण्याकरीता बँक खात्याची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती दिल्यानंतर त्यांचे बँक खात्यातुन रक्कम कपात झाल्याबाबत मॅसेज प्राप्त झाला. सदरबाबत तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने तात्काळ नोंद घेवुन ग़क्क्ड्ध घ्दृद्धघ्ठ्ठ वर तक्रार नोंदविण्यात आली.

(सायबर पोलीस ठाणे अर्ज आवक क्र.२३०२-बी/२०२४ अन्वये)

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

**अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा.न्यायालय यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपये २,७२,४५५/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीसा ठाणे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/ सुवर्णा माळी, पोअं/विलास खाटीक, पोअं/ राहुल बन मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

---------------oo--------------------